<u>नि. फौ. ख. क्र.१०६/२०१९</u>                                  निशाणी २४

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – अविनाश मच्छिंद्र पाटील

वय – ३८ वर्षे,                    व्यवसाय – पोलीस कॉन्स्टेबल, पौड पो.स्टे., जि. जळगाव

पत्ता – रा. पौड, ता. जामनेर, जि. जळगाव

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया त. अ. सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी उरळ पो.स्टे. येथे सन २०१७ ते २०२१ या कालावधीमध्ये पो.कॉ. म्हणून कर्तव्यावर होतो. दि.२७.०३.२०१९ रोजी मी पो.स्टे. येथे कार्यरत असताना पो. हवालदार धनपाल लाटकर यांना गुप्त बातमी मिळाली की, हातरुण ते खंडाळा रोडवर एक इसम गोवंश मांस त्याच्या मोटरसायकलवरुन घेवून जात आहे. सदर बातमीची शहानिशा करण्याकरीता मी, पो.कॉ. शैलेश घुगे व दोन पंच असे मिळून आमच्या खाजगी मोटरसायकलने खंडाळा बसस्टॉपवर गेलो. आम्ही हातरुण ते खंडाळा रोडवर नाकाबंदी केली. नाकाबंदीदरम्यान एक इसम सकाळी ५ वा. सुमारास हातरुण ते खंडाळा रोडने मोटरसायकलने येताना दिसला. त्या इसमास आम्ही थांबवून त्याची विचारपुस केली असता त्याने त्याचे नाव शे. बिसमिल्ला शे. हबीब, रा. हातरुण असे सांगितले. सदर इसम व मोटरसायकल क्र. एमएच३०/बीएफ/४३०१ याची पाहणी केली असता सदर मोटरसायकलवर प्लॅस्टीकच्या कॅरेटमध्ये गोवंश मांस ५० किलो मिळून आले. आता मी पुन्हा सांगतो की, सदर मोटरसायकलचा क्र. एमएच३०/बीएफ/३४०१ असा होता.

२. सदर गोवंश मांस जागेवर दोन पंचांसमक्ष नमुना तपासणीकरीता काचेच्या भरणीमध्ये काढून घेतले व सदर काचेची भरणी दोन पंचांच्या सहीच्या कागदी लेबलने चिकटवून सिलबंद केली. तसेच उर्वरीत मुद्देमाल हा दोन पंचांसमक्ष जप्त करुन ताब्यात घेतला. तसेच दोन पंचांसमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा पी.सी. धनपाल लाटकर यांनी केला. त्यानंतर आरोपी मोटरसायकल व मुद्देमालासह पो.स्टे. येथे आणले. त्यानंतर सदर घटनेची फिर्यादी श्री. लाटकर यांनी आरोपीविरुध्द पो.स्टे. येथे दिली. आरोपी क्र.२ शे. साजीद शे. कादर न्यायालयात असल्याबाबत साक्षीदार यांनी ओळखले.

३. आरोपी क्र.१ याच्याकडे सदर गोवंश मांसाबाबत विचारणा केली असता त्याने सांगितले की, तो शे. साजीद शे. कादर याच्याकडे मजूरी करतो व त्यास किलोमागे रु.४० मिळतात तसेच मिळून आलेल्या मांसाचा मालक शे. साजीद शे. कादर असल्याचे सांगितले. आरोपी क्र.२ यास तपासिक अधीकारी यांनी चौकशी करीता बोलाविले असता मी त्यास पो.स्टे. पाहिले होते. आरोपी क्र.१ च्या ओळखीबाबत कोणताही वाद नाही.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन. एन. जामोदे यांचे मार्फत उलटतपासः</u>**

४. हे म्हणणे खरे आहे की, पो.स्टे.ला मिळालेल्या गुप्त बातमीची नोंद स्टेशन डायरीला केली जाते व त्याबाबतचे कागदपत्र हे सदर केसकामी जोडावे लागतात. आम्ही सदर बातमीची शहानिशा करणेकरीता ज्या वाहनाने गेलो त्याची नोंद स्टेशन डायरीला केली नव्हती. पोलीसांनी माझा जबाब दि.२८.०३.२०१९ रोजी नोंद केला. आम्ही छापा टाकण्याकरीता घटनास्थळी गेलो त्यावेळी आमच्याकडे वजन करण्याचे साहित्य अथवा इतर साहित्य नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मिळून आलेले तथाकथित गोवंश मांसाची विल्हेवाट काय लावली याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.२७.०३.२०१९ रोजी मी व पीसी धनपाल घुगे व श्री. लाटकर यांच्यासोबत कोठेही गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासादरम्यान सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही तसेच आरोपीकडून कोणतेही गोवंश मांस जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– ०५.०६.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.06.05 17:07:01 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | ०५/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | ०५/०६/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०५/०६/२०२६ |